*THINK INDIA JOURNAL*

ISSN:0971-1260
Vol-22- Issue-38-December-2019

# पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा सहभाग

**डॉ. रमेश पदु म्हात्रे**
**ग्रामीण विकास विभाग प्रमुख,**
**महात्मा फुले महाविद्यालय, पनवेल**

## प्रस्तावना

भारत ही विकसनशील देश आहे. भारतातील जवळजवळ ७०% जनता ग्रामीण भागात वास्तव्य करत असून ती ५ लाख ९७ हजार खेड्यांमध्ये विखुरलेली आहे. ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी महिलांची संख्या जवळजवळ ५०% असल्यामुळे विकास प्रक्रियेत त्यांचा वाटा देखील तितकाच महत्वाचा आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शासन संस्थांमध्ये महिला सहभागाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पंचायत राज व्यवस्थेचा उगम सामुहिक विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून झाला. २ ऑक्टोबर १९५२ रोजी आपल्या देशात सामुहिक विकास कार्यक्रमाची अमलबजावणी सुरु झाली. पण अल्पावधीत या कार्यक्रमाला अपयश आले. कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी बलवंतराय मेहता याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. बलवंतराय मेहता समितीने लोकशाही विकेंद्रीकरणाची त्रिस्तरीय ग्रामीण प्रशासन यंत्रणा तयार करण्यासंबंधी महत्त्वाची शिफारस केली. या समितीने केलेल्या शिफारशी राष्ट्रीय विकास मंडळ व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या केंद्रीय समितीने स्वीकारल्या. याच त्रिस्तरीय यंत्रणेचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचायत राज असे नामकरण केले.

## पंचायत राज व्यवस्थेत महिला सहभागाचे महत्त्व:

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न सुरु झाले. शोषित पिडीत व उपेक्षित वर्गाच्या विकासासाठी भारतीय राज्य घटनेत तरतूद करण्यात आली. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार संविधानात देण्यात आले. मात्र स्वातंत्र्यानंतर अनेक वर्ष महिला उपेक्षित राहिल्या. महात्मा गांधींच्या मते भारतीय स्त्रियांना विकासापासून वंचित ठेवणे म्हणजे देशाच्या विकासाची अर्धी शक्ती गमावणे होय.त्यासाठी स्त्री उन्नतीच्या दृष्टीकोनातून समाजाने पुढे आले पाहिजे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविला पाहिजे यादृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत असे नमूद केले.

ग्रामीण भागात महिलांशी निगडीत अनेक अनिष्ट रूढी परंपरा अस्तित्वात होत्या. महिलांना दैनंदिन जीवनात अनेक समस्या भेडसावत होत्या या समस्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला सहभागाची आवश्यकता होती. मात्र पंचायत राज विषयक कायदे, घटना दुरुस्ती व महिलाआरक्षण विधेयक या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने वाटा

१

मिळाल्यामुळे सामाजिक समस्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने महिला सहभागाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

 Copyright ⓒ 2019Authors

ISSN:0971-1260
Vol-22- Issue-38-December-2019

**मुंबई ग्रामपंचायत कायदा-१९५८**

मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ मध्ये स्त्रियांसाठी राखीव जागांची तरतूद करण्यात आली. मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ कलम १० पोट-कलम (२) उपबंधास अधीन आणि राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून जिल्हाधिकारी स्त्रियांसाठी राखीव प्रभाग नेमून देतील आणि अशा प्रभागात स्त्रियांनाच निवडून देण्याची तरतूद आहे.

**महाराष्ट्रातील पंचायत राज:**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्रात पंचायत राज स्थापन करण्याच्या हलचाली सुरु झाल्या. महाराष्ट्राचे तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. यासामितीने आपला अहवाल १९६१ मध्ये राज्य शासनाला सदर केला. या हवालात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय पंचायत राज यंत्रणा निर्माण करण्याची शिफारस केली होती. मात्र जिल्हा परिषद ही शिखर संस्था असावी, जिल्हा परिषदेला सर्वात अधिक अधिकार देण्यात यावे असे नमूद करण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्रात १ मे १०६२ रोजी पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यात आली. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत महाराष्ट्र राज्य सुरुवातीपासूनच आघाडीवर होते मात्र महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेत महिला, अनुसूचित जाती व जमाती तसेच इतर मागास वर्गीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण देऊन ग्रामीण स्तरावर सामाजिक बदलाची प्रक्रिया गतिमान केली होती.

महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेच्या निर्मितीनंतर ग्रामीण भागातील नवीन नेतृत्व निर्मितीला संधी मिळाली. महिलांचा पंचायत राज व्यवस्थेतील सहभाग वाढत गेला मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात राष्ट्रीय पक्षांचा हस्तक्षेप वाढल्याने निर्णय प्रक्रियेत हवी तशी संधी महिलांना मिळाली नाही. त्यामुळे लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग फारसा यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही.

**७३ वी घटना दुरुस्ती:**

७३ वी घटना दुरुस्ती विधेयकाला २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेने मान्यता दिली. आणि २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने या क्रांतिकारी विधेयकाला मान्यता दिली. २४ एप्रिल १९९३ रोजी

२

राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने हे विधेयक ७३ वीघटना दुरुस्ती कायदा म्हणून अस्तित्वात आले. ७३ वी घटना दुरुस्ती पंचायत राज व्यवस्थेचे अधिकार आणि महिला आरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानले जाते. पंचायत राज विषयक अनेक महत्वाच्या तरतुदींबरोबर ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या तिन्ही स्तरांवर महिलांना ३३ % आरक्षण देण्यात आले. त्याचबरोबर ग्रामपंचायतीचे सरपंच, पंचायत समितीचे सभापती व जिल्हा परिषदेचे अध्यक्ष या पदांसाठी देखील महिलांना ३३ % आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.

महिला आरक्षणाबरोबर अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना लोकसंखेच्या प्रमाणात आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तर इतर मागासवर्गीय लोकांसाठी २७% आरक्षण देण्यात आले आहे. महिलांसाठी


Copyright ⓒ 2019Authors

ISSN:0971-1260
Vol-22- Issue-38-December-2019

३३% आरक्षण देण्यात आले हे आरक्षण देताना ह्यामध्ये महत्वाची तरतूद करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जमातींच्या लोकांना लोकसंखेच्या प्रमाणात जितक्या जागा मिळतील त्यात ३३% आरक्षण अनुसूचित जाती व जमातींच्या महिलांसाठी असेल,मागास्वर्गीच्या आरक्षणात ३३%महिलांसाठी तर खुल्या वर्गासाठी ज्या जागा असतील त्यामध्ये ३३% आरक्षण खुल्या वर्गातील महिलांसाठी असेल. पंचायत राज व्यवस्थेतील महिला आरक्षणामुळे गाव पातळीपासून ते जिल्हा पातळीपर्यंत समाजाचे नेतृत्व करण्याची संधी महिलांना प्राप्त झाली आहे. ७३ व्या घटना दुरुस्ती नंतर सुरुवातीच्या काळात पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा फारसा प्रतिसाद पहावयास मिळाला नाही मात्र काही वर्षानंतर महिलांना राजकीय क्षेत्राची जाणीव झाली. सुशिक्षित महिलांचा पंचायत राज व्यवस्थेत उस्फुर्त प्रतिसाद वाढत गेला. त्यांच्यामध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली. त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यामुळे गाव पातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत धाडसी निर्णय घेऊन समाज परिवर्तनाला दिशा देण्याचे काम महिला नेतृत्वाने केले.

**महिला आरक्षण विधेयक:**

पंचायत राज व्यवस्थेत महिलांना ५०% आरक्षण देण्यासंदर्भात तत्कालीन पंतप्रधान देवेगौडा यांनी भारतीय संविधानात ८१ वी घटना दुरुस्ती सुचविली. मात्र विधेयक मंजूर होण्याअगोदर लोकसभा बरखास्त झाली. १९९८ साली भारतीय जनता पार्टी सरकारने भारतीय संविधानात ८४ व्या घटना दुरुस्ती कायद्याच्या रूपाने महिला आरक्षण विधेयक मांडले परंतु यावेळी देखील लोकसभा बरखास्त झाली त्यामुळे विधेयक मंजूर होऊ शकले नाही.

२००४ मध्ये सत्तेवर आलेल्या आघाडी सरकारने ६ मे २००८ रोजी महिला आरक्षण विधेयक राज्यसभेत सादर केले. २५ फेब्रुवारी २०१० रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने महिला आरक्षण विधेयकाला अनुमोदन दिले. तर

३

९ मार्च २०१० रोजी राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक बहुमताने पारित करण्यात आले. महाराष्ट्रात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका यामध्ये महिलांना ५०% आरक्षण देण्याचा ऐतिहासिक विधेयक एकमुखाने मंजूर केला. स्त्री –पुरुष समानतेच्या दृष्टीने महिलांना सत्तेत पन्नास टक्के वाटा मिळणे आवश्यक होते. राज्य शासनाने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५०% आरक्षणाचा निर्णय घेतल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने महिलांसाठीच्या ५०% आरक्षणाची कार्यवाही केली त्यामुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महिलांसाठी ५०% जागांची तरतूद केली. सध्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायती, नगरपालिका व महानगरपालिका यामध्ये महिलांसाठी ५०% आरक्षण असून महिला सदस्यांच्या सक्षमीकरणावर भर दिला जात आहे.


Copyright ⓒ 2019Authors

ISSN:0971-1260
Vol-22- Issue-38-December-2019

**समारोप:**

पंचायत राज व्यवस्थेत महिला सहभाग या विषयी सखोल विवेचन केल्यानंतर असे म्हणता येईल की, अनेक पिढ्यांपासून वंचित उपेक्षित राहिलेल्या महिलांना सर्व प्रथम मुंबई ग्रामपंचायत कायद्याने महिला नेतृत्वाची संधी दिली. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्वाची अधिक संधी मिळण्यासाठी ७३ व्या घटना दुरुस्तीमध्ये कायद्याने ३३% आरक्षण देण्यातआले. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा सक्रीय सहभाग वाढला. ८१ व्या घटना दुरुस्तीनुसार महिलांना ५०% आरक्षण मिळाल्याने खऱ्या अर्थाने पंचायत राज व्यवस्थेत पुरुषांच्या बरोबरीने महिलांना अधिकार प्राप्त झाले. महिला विविध क्षेत्रात अग्रेसर होऊ लागल्या, सामाजिक राजकीय क्षेत्रात सहभाग वाढल्याने ग्रामीण विकासात महिलांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे.

**संदर्भ सूची:**

१. अलका देशमुख - शासन आणि राजकारण, अंकुश प्रकाश नागपूर
२. शोभा कारेकर व शरद घोडके- महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण , अंकुश प्रकाश नागपूर
३. Sharma Sanjay Prakash- Pachayati Raj, Vista International Publishing House
४. शंकरराव जोशी, मुंबई ग्रामपंचायत नियम, न्यायदीप प्रकाशन


Copyright ⓒ 2019Authors